लोकमत नाशिक, गुरुवार, दि. ६ सप्टेंबर २०१८



वसुंधरा महोत्सवांतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत बोलताना वीरेंद्र चित्राव.

# 'इको रेंजर्स'द्वारे पर्यावरण संवर्धनाचा 'श्री गणेशा'

## कार्यशाळा : वसुंधरा महोत्सवांतर्गत प्रशिक्षण

**नाशिक :** पर्यावरण संवर्धन आणि वसुंधरेच्या रक्षणार्थ शहरातील पाच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'इको रेंजर्स' म्हणून किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवांतर्गत झालेल्या कार्यशाळेत निवड करण्यात आली. या इको रेंजर्सकडून वर्षभर महाविद्यालयापासून शहरातील विविध भागांमध्ये पर्यावरण संवर्धनाचा जागर केला जाणार आहे. या मोहिमेचा श्रीगणेशा आगामी गणेशोत्सवातून केला जाणार आहे.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव २०१८ अंतर्गत इको रेंजर्स अर्थात पर्यावरणरक्षक यांची प्रशिक्षण कार्यशाळा व्ही.एन. नाईक महाविद्यालयात बुधवारी (दि. ५) झाली. या कार्यशाळेत एकूण पाच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून प्रशिक्षण पूर्ण केले. यातील सर्व प्रशिक्षित इको रेंजर्स अर्थात पर्यावरणरक्षक इतर नवीन विद्यार्थ्यांना या मोहिमेत प्रशिक्षण देऊन सहभागी करुन घेणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या संपूर्ण वर्षभरातील जागृती मोहिमेत किर्लोस्कर वसुंधरा सर्व प्रकारचे तांत्रिक साहाय्य केले जाणार आहे. कार्यशाळेत अमित टिल्लू, वीरेंद्र चित्राव यांनी विषयाची हाताळणी करत संपूर्ण माहिती दिली. इको रेंजर्स ने काय केले पाहिजे, वर्षभर कसे उपक्र म राबविले पाहिजे, स्वत:च्या महाविद्यालय आणि जवळपासच्या परिसरातील नागरिकांना कशाप्रकारे पर्यावरणसंबंधी माहिती देत होणारे नुकसान, फायदे याबाबत जागरुक करुन सविस्तर माहिती दिली. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वन्यजीव सप्ताहांतर्गत जंगल व वन्यजीव यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी जागृतीपर कार्यक्र म हाती घेण्यात आहे. तर वर्षभर गोदावरी व तिच्या उपनद्या कशा प्रदूषणमुक्त होतील या दृष्टीने प्रयत्नशील राहणार आहे. प्रास्ताविक निखिल चामनिकर यांनी केले आहे.